जाहिरात क्रं ०३

# जिल्हा परिषद, नांदेड
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
## (शालेय पोषण आहार योजना )

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत रिक्त असणारी डेटा एंट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील ११ महिन्याचे कालावधी करीता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड येथे दिनांक ३०/०९/२०२१ अखेर पर्यंत सकाळी १०.०० ते ६.०० या कार्यालयीन वेळेत समक्ष अथवा पोष्टाने सुट्टीचे दिवस वगळुन स्वीकारले जातील.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | मासिक एकत्रित परिश्रमिक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १. | डेटा एंट्री ऑपरेटर | जिल्हास्तर- ००<br>तालुका स्तर- ०६<br>**एकूण ०६** | रु.१५,९००/- | १. किमान १२ वी पास<br>२. मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.<br>३. इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.<br>४. एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम परीक्षा |

**१. वयोमर्यादा** - दिनांक ३०/०९/२०२१ अखेर वय वर्षे किमान १८ व कमाल ३५.

**२. निवड पध्दती -**

२.१ शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारास १० वी व १२ वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढून त्यामध्ये उमेदवार पदवीधर असल्यास त्यास १० गुण बोनस येतील. गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करुन गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परीक्षेकरिता एका पदासाठी गुणानुक्रमे १२ उमेदवार याप्रमाणे बोलविण्यात येईल.

२.२ सदर यादी मधील उमेदवारांची मराठी टायपिंग-३० शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टायपिंग-४० शब्द प्रति मिनिट व संगणक ज्ञान प्रात्यक्षिक अशी एकूण १०० गुणाची परिक्षा घेण्यात येईल.

२.३ सदर २.२ मधील ज्या उमेदवारांना किमान ५० गुण प्राप्त होतील असे उमेदवार डाटा एन्ट्री ऑपरेटरर्स च्या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

२.४ उमेदवारास २.१ व २.२ मधील शैक्षणिक पात्रतेबाबत मिळालेल्या गुणांची बेरीज करुन गुणानुक्रमे मंजूर पदाएवढी निवड यादी प्रसिध्द केली जाईल आणि त्यानुसार सदर उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात येईल व तेवढ्याच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द केली जाईल.

२.५ सदर पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नाही.

**३. सूचना :-**

३.१ उमेदवारांनी विहीत नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटांवर "डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज" असे नमूद करावे.

P.T.O.

Scanned with CamScanner

३.२ उमेदवारांनी अर्जासोबत रू.५००/- शुल्क रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष **शालेय पोषण आहार योजना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड** यांच्या नावे असलेला अर्जासोबत जोडावा.

३.३ अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय, अनुभव इत्यादी संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात.

३.४ अर्जासोबत स्वत:चे पूर्ण नाव व पत्ता असलेला "४ x ६" आकाराचा असलेला रिकामा, रू.५/- चे पोस्टाचे तिकीट लावलेला लिफाफा पाठविण्यात यावा.

३.५ अर्ज करण्याची अंतिम तारीख ३०/०९/२०२१ असेल. यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

३.६ नियुक्ती पूर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहीत नमुण्यात करारनामा करून घेण्यात येईल आणि त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या डेटा एंट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक, अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपद्धती या संबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

३.७ कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

३.८ डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पद्धतीच्या कर्मचाऱ्यास नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही.

३.९ सदर पदांची भरती कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याने बिंदू नामावली प्रमाणे पदे भरण्याची आवश्यकता नाही.

३.१० सदर परीक्षेस बसण्यासाठी पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३.११ परीक्षेचा दिनांक, वेळ व स्थळ जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

३.१२ सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमे यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नांदेड

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नांदेड

Scanned with CamScanner

# जिल्हा परिषद, नांदेड शिक्षण विभाग (प्राथमिक)

## शालेय पोषण आहार योजना - डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज - २०२१

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रं __________ दिनांक __________

प्रति

सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नांदेड

| उमेदवाराचा अलीकडच्या काळातील राजपत्रित अधिकारी यांनी साक्षांकित केलेला पासपोर्ट साईज फोटो |
|---|

**विषय : शालेय पोषण आहार योजना सन २०२१**
**डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज.**

१. उमेदवाराचे नांव श्री/श्रीमती______________________________

(आडनांव) ( स्वतःचे नांव ) (वडीलांचे/पतीचे नांव )

२. पत्र व्यवहाराचा पत्ता ______________________________

______________________________

पिनकोड__________ मोबाईल क्र. __________

३. जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) ______________________________

४. वय ( दिनांक ३०/०९/२०२१ रोजी ) ________ वर्ष ________ महिना ________ दिवस ____

५. अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायीक पात्रता

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० वी | | | | |
| २ | १२ वी | | | | |
| ३ | पदवी | | | | |
| ४ | मराठी टंकलेखन | | | | |
| ५ | इंग्रजी टंकलेखन | | | | |
| ६ | एम.एस.सी.आय.टी. | | | | |

अनुभव :

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | सेवा समाप्ती (पासून-पर्यंत ) | एकुण सेवा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती

१)______________________ २)______________________

३)______________________ ४)______________________

५)______________________ ६)______________________

**प्रतिज्ञापत्र**

प्रमाणित करतो/करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळुन आल्यामुळे माझी निवड रद्द करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक :

ठिकाण : उमेदवाराची स्वाक्षरी

Scanned with CamScanner